रुग्णतपासणी, गंभीर स्थितीतील रुग्णाचे जीवनरक्षण आणि मर्माघातादी विकारांवर प्रथमोपचार



# विषयसूची

१. सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय ! ४

२. ग्रंथाच्या संकलकाचा परिचय ५

३. आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ६

४. ग्रंथाचे मनोगत ८

卐 प्रकरणे

१. काळाची पावले ओळखून प्रथमोपचार शिका ! १०

२. प्रथमोपचाराचे तात्त्विक विवेचन १५

३. प्रथमोपचार पेटीविषयी काही सूचना आणि पेटीतील साहित्य २०

४. प्रथमोपचारकासाठी सामाईक सूचना २४

५. रुग्णाच्या विकाराचे प्राथमिक निदान आणि रुग्णाच्या अवयवांची प्रत्यक्ष पडताळणी (तपासणी) कशी करावी ? ३३

६. गंभीर स्थितीतील रुग्णाच्या जीवितरक्षणासाठी करावयाच्या कृती ४५

७. रक्ताभिसरणाशी संबंधित विकार ७०

८. मज्जासंस्थेशी संबंधित विकार ८६

९. सनातन संस्थेचे ‘प्रथमोपचार प्रशिक्षण’विषयीचे स्वयंसेवी कार्य ! १०५

१०. हिंदु जनजागृती समितीच्या विनाशुल्क ‘प्रथमोपचार प्रशिक्षणवर्गा’त सहभागी व्हा ! १०७

---

**टीप** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

# विषयसूचीतील क्रमांक ४

## ग्रंथाचे मनोगत

सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन हृदयविकारासारख्या काही गंभीर आजारांचे प्रमाण वाढणे, आधुनिक यंत्रांच्या वापराने अपघातांत वाढ होणे आदी कारणांसह भावी तिसरे महायुद्ध, नैसर्गिक आपत्ती, दंगली आदींचाही विचार करता समाज आणि राष्ट्र यांच्याप्रतीचे कर्तव्य म्हणून 'प्रथमोपचार प्रशिक्षण' प्रत्येक सुजाण नागरिकाने घेणे आवश्यक झाले आहे. पाण्यात बुडाल्याने बेशुद्ध होणे, हृदयविकाराचा आकस्मिक झटका येणे अशा अनेक प्रसंगी वैद्यकीय साहाय्य मिळेपर्यंतचा कालावधी पुष्कळच महत्त्वाचा असतो. काही मिनिटांच्या या कालावधीत मिळालेल्या योग्य प्रथमोपचारामुळे रुग्ण मृत्यूच्या दारातून परत येऊ शकतो. हे सर्व जाणून प्रस्तुत ग्रंथमालिका प्रकाशित केली आहे.

ही मालिका तीन भागांत विभागली आहे. 'या खंडाव्यतिरिक्त अन्य दोन भागांमध्ये मजकूर कोणता आहे ?' याची थोडीफार कल्पना वाचकांना यावी, यासाठी त्यांची विज्ञापने या भागाच्या शेवटी दिली आहेत. वाचकाने या मालिकेतील 'भाग १' संग्रही ठेवणे आवश्यक आहे; कारण त्यात 'प्रथमोपचारकात आवश्यक असणारे गुण आणि त्याचे वर्तन', 'प्रथमोपचार पेटीत कोणते साहित्य असावे ?', 'प्रथमोपचारकासाठी सामाईक सूचना', 'रुग्णाच्या विकाराचे प्राथमिक निदान व प्रत्यक्ष पडताळणी (तपासणी) कशी करावी ?' आदींविषयीसुद्धा विवेचन केले आहे. हे विवेचन 'भाग २' आणि 'भाग ३' यांत पृष्ठसंख्यावाढीस्तव दिलेले नाही.

प्रस्तुत ग्रंथात गंभीर स्थितीतील रुग्णाच्या जीवितरक्षणासाठी वापरावयाच्या 'AB-CABS' या प्रथमोपचार पद्धतीचे विवेचन केले आहे. वर्ष २०१० पासून ही पद्धत जगभर वापरण्यात येऊ लागली आहे. (तत्पूर्वी प्रथमोपचाराची ABC – दुसरे नाव DRSABCD – ही पद्धत वापरण्यात येत असे.) या पद्धतीच्या समावेशामुळे प्रथमोपचारासंबंधीचे ग्रंथातील विवेचन अद्ययावत् झाले आहे.

ग्रंथात संबंधित रोगांची काही लक्षणेही सांगितली आहेत. ग्रंथात ‘लक्षणे’ हा शब्द रुग्णाने सांगितलेल्या अथवा रुग्णाविषयी सांगण्यात आलेल्या तक्रारी (Symptoms), तसेच रुग्णाला तपासतांना आढळणारी आजाराची चिन्हे (Signs) अशा दोन अर्थांनी वापरण्यात आला आहे. एखाद्या आजाराची ग्रंथात सांगण्यात आलेली सर्वच लक्षणे एकाच वेळी एखाद्या रुग्णात आढळतील, असे नाही, याचीही वाचकांनी नोंद घ्यावी. ‘प्रथमोपचार प्रशिक्षण’ तज्ज्ञांकडून घेणे योग्य ठरते. असे प्रशिक्षण घेणाऱ्यांना साहाय्यभूत व्हावे, या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथमालिकेतील विवेचन केले आहे.

ग्रंथमालिकेच्या तीनही भागांत मिळून १४० हून अधिक आकृत्या देण्यात आल्या आहेत. या आकृत्यांमुळे प्रथमोपचारकाला विविध कृती समजून घेऊन त्या प्रत्यक्ष करणे सोपे जाईल. ग्रंथात आवश्यक तेथे मूलभूत तात्त्विक माहिती थोडक्यात देण्यासह संबंधित रोग किंवा आकस्मिक दुर्घटना रोखण्यासाठी करावयाचे ‘प्रतिबंधात्मक उपाय’ही सांगितले आहेत.

ही ग्रंथमालिका वाचून आणि ‘प्रथमोपचार प्रशिक्षण’ घेऊन प्रत्येक सुजाण नागरिक उत्तम प्रथमोपचारक बनावा, तसेच महायुद्धकाळात समाज अन् राष्ट्र यांच्या सेवेसाठी प्रत्येक घर हे ‘प्रथमोपचार केंद्र’ व्हावे, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावाच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टीवाचनाच्या माध्यमातून सप्तर्षी सनातनला मार्गदर्शन करतात. सप्तर्षींच्या आज्ञेनुसार १३.५.२०२० या दिवसापासून सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. यांच्या नावातील संबोधनाविषयी परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सांगितले, ‘‘श्रीचित्शक्ति’ ही भगवंताच्या वैश्विक ज्ञानाशी संबंधित आहे.’’